अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ०७.०२.२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०६/२०२३ |
| कलम | कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -१९८८ |
| आरोपी आलोसे | आलोसे लोकसेवक - १) श्री मोहन रामू राठोड,वय ४२ वर्षे, धंदा - नोकरी (दुय्यमअभियंता, इमारत व कारखाने, '' एच '' पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, बांद्रा (पश्चिम),मुंबई ५०. रा.टी. रुम.नं.०३, आर.सी.एफ कॉलनी, बी. एम.सी.क्वॉटर्स, चेंबुर, मुंबई<br>खाजगी इसम - २) मोहम्मंद शोएब मोहम्मंद रजा खान, ४० वर्षे, राहणार बी १०३, इनायत बिल्डिंग, म्हाडा, मालवणी, मालाड (पश्चिम),मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | **रुपये ९,००,०००/- ( अक्षरी रु. नऊ लाख रुपये )** |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | **रुपये ८,५०,०००/- ( अक्षरी रु. आठ लाख पन्नास हजार रुपये )** |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांचे चेंपल रोड परीसरात दोन मजली (तळमजला + दोन मजले) राहते घर असुन दिनांक १६/०१/२०२३ रोजी त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका ''एच'' पश्चिम विभागाकडुन घराचा पहिला व दुसरा मजला अनधिकृत असल्याने निष्कासन कारवाई करणेबाबत नोटिस प्राप्त झाल्याने फिर्यादी हे सदर कार्यालयात जावून आलोसे लोकसेवक क्र. १ यांना भेटले व त्यांनी त्यांच्या घराचे बांधकाम अनाधिकृत नसल्याबाबत सांगून सदर बांधकामावर निष्कासन कारवाई करु नये याबाबत विनंती केली. तदनंतर सदर बांधकाम निष्कासित न करण्याकरीता आलोसे लोकसेवक यांनी त्यांचेकडे रु. १५,००,०००/- ची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि. ०६/०२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज दिला.<br>सदर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.०६/०२/२०२३ रोजी पंचासमक्ष पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे लोकसेवक क्र.१ यांनी रु.९,००,०००/- ची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु ८,५०,०००/- खाजगी इसमामार्फत लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे स्पष्ट झाले.<br>त्यानुसार आज दि. ०७/०२/२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळापुर्व / सापळा कारवाई दरम्यान आलोसे लोकसेवक क्र.१ यांनी सांगितल्याप्रमाणे खाजगी इसमास फिर्यादी यांचेकडुन रु ८,५०,०००/- लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.<br>यास्तव आरोपीत लोकसेवक व खाजगी इसम यांचेवर कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग**

०७/०२/२३
( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास [illegible] आलोसेबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.


पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, मोबाईलॲप :- www.acbmaharashtra.net
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB


Scanned with OKEN Scanner